# व्यंकटेश महाविद्यालयात राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा संपन्न

"इचलकरंजी वस्त्र नगरीच्या सर्वांगीण विकासात मोलाचा वाटा असणारे श्री नारायणराव बाबासाहेब एज्यूकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष, उत्कृष्ट व दयाळू नेतृत्व असणारे कर्मयोगी कै. मदनलाल बोहराशेठजी यांच्या जयंतीनिमित्त श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथे पदवी स्तरावरील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते." मदनलाल बोहरा शेठजी यांच्या कार्याचा गौरव व त्यांचा आदर्श व सन्मानाप्रीत्यर्थ सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.एकूण ३१ स्पर्धकांनी वक्तृत्व स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. अहमदनगर, पुणे, नाशिक, कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातून विविध महाविद्यालयातून स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. सहभागी स्पर्धकांनी अजून किती निर्भया?, हरवत चाललेल्या नात्यातील गोडवा, सोशल मीडियाच्या चक्रव्यूहात भारतीय तरुण, कृषी प्रधान भारतातील शेतीचे वर्तमान आणि गतिमान भारताला नीतिमान राज्यकर्त्यांची गरज अशा विविध विषयांवर आपले परखड मत मांडले. आपला उत्स्फूर्त संवाद व वक्तृत्व कलेची मांडणी अत्यंत उत्कृष्टपणे विचार मंचावर मांडली. प्रत्येक श्रोत्याच्या अंगावर शहारे आणणारे, मंत्रमुग्ध करायला लावणारे, विचाराची चक्र गतिमान करणारे, विचार करायला भाग पाडणारे वक्तृत्व कलेचे सादरीकरण सहभागी विद्यार्थ्यांनी सदर स्पर्धेच्या वेळी केले. स्पर्धेमध्ये कु. महेश उशीर या विद्यार्थ्यांचा प्रथम क्रमांक आला त्यास दहा हजार रुपये रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र असे बक्षीस देण्यात आले, तर द्वितीय व तृतीय क्रमांक अनुक्रमे कु.आदर्शराज यादव व कु.रमेश कचरे या विद्यार्थ्यांचा आला. त्यांना देखील सात हजार रुपये व पाच हजार रुपये रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र बक्षीस म्हणून देण्यात आले. याशिवाय उत्तेजनार्थ दोन विद्यार्थ्यांना अनुक्रमे तीन हजार व दोन हजार रोख रक्कम व प्रशस्तीपत्रक बक्षीस म्हणून देण्यात आले. तसेच इतर सहभागी स्पर्धकांना प्रशस्तीपत्रक देण्यात आले. सदर वक्तृत्व स्पर्धेच्या परीक्षकपदी सौ. सिंधू जयवंत आवळे, डॉ. श्रीराम मोहिते व श्री. युवराज मोहिते उपस्थित होते. चिकित्सक व अभ्यासू वृत्तीने त्यांनी प्रत्येक सहभागी स्पर्धकाचे परीक्षण केले व निकाल जाहीर केला. या स्पर्धेच्या संयोजन समिती प्रमुख डॉ. एस. एन. जरंडीकर व नियोजन समितीचे प्रमुख ग्रंथपाल एम. पी. केसरकर यांनी अतिशय उत्कृष्टरित्या संयोजन करून स्पर्धा पार पाडण्यात बहुमोल योगदान दिले. बक्षीस वितरण कार्यक्रमाप्रसंगी ना. बा. एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्री. कृष्ण बोहरा शेठजी अध्यक्षपदी उपस्थित होते त्यांनी स्पर्धेतील सर्व सहभागी स्पर्धकांचे अभिनंदन केले त्यांना प्रोत्साहन दिले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मदनलाल बोहरा शेठजी जयंतीनिमित्त हा नवीन उपक्रम व्यंकटेश महाविद्यालयाने सुरू केला हे गौरवास्पद व अभिमानास्पद आहे असे त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगताध्ये मत व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय माने यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. दरवर्षी ही स्पर्धा शेठजींच्या जयंती निमित्त आयोजित केली जाईल असे आश्वासन देखील त्यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सहयोगी प्राध्यापिका डॉ. एस. एन. जरंडीकर यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्यक्रमाप्रसंगी उप-प्राचार्य डॉ. बी. एन. कांबळे उपस्थित होते. परीक्षक श्री. युवराज मोहिते यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या वक्तृत्व कला प्रदर्शनाचे कौतुक केले प्रशंसा केली व अभिनंदन केले. सर्वच स्पर्धकांचे सादरीकरण उत्कृष्ट होते परंतु त्यामधूनही विजेते स्पर्धकाची निवड ही करावी लागते त्यामध्ये विजेत्या स्पर्धकाची निवड करणे अत्यंत कठीण काम होते कारण सर्वच स्पर्धकांचे उत्कृष्ट कला सादरीकरण होते. प

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मोहिनी अंचालिया केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ग्रंथपाल श्री. एम. पी. केसरकर यांनी केले. कार्यक्रमाप्रसंगी प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर वर्ग, पालक आणि विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.